आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता
१७ फेब्रुवारी २०२५ सोमवार

**ठळक बातम्या**

- बँकेतल्या ठेवींना अधिक विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन, MSME साठी म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते सुरुवात

- येत्या १० मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार, अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून

- इस्रायली लष्कराच्या हल्ल्यात हमासच्या मोहिम विभागाचा प्रमुख मोहम्मद शाहीन ठार

**आणि**

- महिलांच्या प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

बँकेतल्या ठेवींना अधिक विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर गैरव्यवहारांमुळं बँक खात्यात पैसे अडकून पडलेल्या खातेदारांना अधिक रक्कम काढता येईल. वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागाराजू यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतल्या घोटाळ्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. सध्या DICGC मार्फत ५ लाखापर्यंतच्या ठेवी परत मिळतात.

**होल्ड (१,२३ सेकंद)**

*वीमा एजंटकडून काही वेळा ग्राहकांना फसवून वीमा योजनेची विक्री केली जाते. हे प्रकार टाळण्यासाठी वीमा योजनेची खरेदी केल्यानंतर एक वर्षापर्यंत ग्राहकांना फेरविचार करता येईल. या कालावधीत त्यांना योजना आवडली नाही तर या योजनेसाठी भरलेला पूर्ण प्रीमियम परत मिळेल, अशी तरतूद केल्याचंही अर्थमंत्र्यांनी सांगितलं.*

*महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात पुरेशा तरतुदी नसल्याचं विरोधकांच्या आरोपांवर अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ राज्यातल्या गुंतवणूकदारांनाही मिळतो आहे. केंद्र सरकारच्या धोरणामुळेच संरक्षण उत्पादन निर्यातीत महाराष्ट्र आघाडीवर आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.*

*गेल्या काही दिवसात देशातल्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात घसरण सुरू आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार पैसे काढून घेत असल्यानं ही घसरण सुरू आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर अर्थमंत्री म्हणाल्या, देशातल्या बाजारपेठांमधून गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळत असल्यानं गुंतवणूकदार पैसे काढून घेत आहे. जागतिक पातळीवर अस्थिरता निर्माण झाल्यावर हे प्रकार होतात, असं वित्त सचिव तुहीन कांत पांडे म्हणाले. शेअर बाजारांचं नियमन सेबीकडे आहे. बाजारात जेव्हा गैरप्रकार होतील, तेव्हा सरकार त्यात हस्तक्षेप करेल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. करदात्यांना पर्याय उपलब्ध असावा म्हणून आयकराच्या संदर्भात जुनी आयकर रचना सरकारनं कायम ठेवली आहे. मात्र अधिकाधिक करदाते नव्या कर रचनेला स्वीकारत असल्याचं ते म्हणाले.*

**<><><><>**

MSME साठी म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेची सुरुवात आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते आज मुंबईत झाली. अर्थसंकल्पाच्या

संदर्भात विविध उद्योजकांशी चर्चा करण्यासाठीच्या कार्यक्रमात त्यांनी या योजनेची सुरुवात केली. या योजनेमुळे MSME ना यंत्रसामग्री किंवा उपकरणं खरेदी करण्यासाठी १०० कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज तारणमुक्त स्वरुपात उपलब्ध होईल.

स्वामीह निधीचा लाभ घेतलेल्या घर खरेदीदारांना त्यांनी घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या.

**<><><><>**

अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी सादर करणार आहेत. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला ३ मार्चपासून सुरुवात होणार आहे. पहिल्या दिवशी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर राज्यपालांचं अभिभाषण होईल.

**<><><><>**

मराठी भाषा विभागानं मराठी साहित्य दृकश्राव्य माध्यमांवर उपलब्ध करून द्यावं, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मराठी भाषा विभागाची बैठक आज मुंबईत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मराठी भाषेचं जतन, संवर्धन आणि प्रचारासाठी विविध आधुनिक उपक्रम राबवण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. मराठीची जास्तीत जास्त पुस्तके इंटरनेटवर उपलब्ध करून देण्याची सूचनाही शिंदे यांनी केली. मराठी साहित्याचा प्रसार होण्यासाठी प्रत्येक बृहमंडळाला ५०० मराठी पुस्तकं प्रदान करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

**<><><><>**

राजधानी नवी दिल्लीत आज पहाटे पाच वाजून ३६ मिनिटांनी भूकंपाचे झटके बसले. त्याची तीव्रता ४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा

केंद्रबिंदू दिल्लीजवळ धौल कुवा इथं पाच किलोमीटर खोलीवर होता. यात जीवित अथवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही.

**बिहार**च्या सिवान आणि आसपासच्या जिल्ह्यातही आज सकाळी भूकंपाचे धक्के बसले. आज सकाळी आठ वाजून दोन मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले असून भूकंप मापकावर त्याची तीव्रता ४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू सिवानपासून १० किलो मीटर अंतरावर असल्याची माहिती पटणा इथल्या भारतीय हवामान विज्ञान विभागानं दिली.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभेचे विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी आणि इतर तीन भाजपा आमदारांना आज विधानसभेतून ३० दिवसांसाठी किंवा अधिवेशन सुरू असेपर्यंत निलंबित केलं आहे. विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सरस्वती पूजेला झालेल्या विरोधाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडून निवेदनाची मागणी केली. यासंदर्भात अग्निमित्रा पॉल यांच्यासह भाजपच्या महिला सदस्यांनी स्थगन प्रस्ताव मांडला. विधानसभेचे अध्यक्ष बिमोन बंदोपाध्याय यांनी हा प्रस्ताव स्वीकारला मात्र त्यावर चर्चा करण्याची परवानगी नाकारली. त्यानंतर विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी आणि भाजप आमदारांनी सभागृहातून बाहेर पडत विधानसभेबाहेर निदर्शने केली. सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे मुख्य प्रतोद निर्मल घोष यांनी शुभेंदू अधिकारी आणि इतर भाजप आमदारांच्या वर्तनावर टीका करणारा ठराव मांडला आणि त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर सभागृहात आवाजी मतदानानं ठराव मंजूर करण्यात आला.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेली घसरण आज थांबली. ब्लु चिप कंपन्यांच्या शेअर खरेदीमुळे सेन्सेक्स आज ५८ अंकांनी वधारला आणि ७५ हजार ९९७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३० अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ९५९ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

एसबीआय म्युच्युअल फंडने आज अवघे २५० रुपये गुंतवता येतील, अशा SIP ला सुरुवात केली. सर्व महत्त्वाच्या गुंतवणूक व्यासपीठांच्या आधारे SBI म्युच्युअल फंडाच्या विविध योजनात किमान अडीचशे रुपये SIP द्वारे गुंतवता येतील. याचा फायदा नवीन गुंतवणूदार, असंघटित क्षेत्रातले कामगार तसंच छोट्या बचतीसाठी इच्छुक असणाऱ्यांना होईल, अशी आशा कंपनीला आहे.

**<><><><>**

अमेरिकेत कथितरित्या अवैध पद्धतीने गेलेल्या ११२ भारतीयांना घेऊन आलेलं विमान अमृतसर इथल्या विमानतळावर काल रात्री उशीरा उतरलं. भारतीयांची अमेरिकेतून पाठवणी करणारं हे तिसरं विमान आहे. यातले ४४ नागरिक हरियाणामधले, ३३ गुजरातमधले, ३१ पंजाब, २ उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातले प्रत्येकी एक जण आहे. या प्रवाशांची औपचारिक तपासणी झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात येईल.

**<><><><>**

इस्रायलच्या लष्करानं आज दक्षिण लेबनॉनमध्ये केलेल्या ड्रोन हल्ल्यात हमासचा लष्कराच्या मोहिम विभागाचा प्रमुख मोहम्मद शाहीन ठार झाल्याचा दावा केला आहे. शाहीनने लेबनॉनच्या हद्दीतून दहशतवादी हल्ल्यांची योजना आखल्याचा आरोप इस्रायलनं केला आहे.

**<><><><><>**

रशिया आणि अमेरिका यांच्या परराष्ट्र मंत्र्यांमध्ये उद्या चर्चा होणार आहे. रशियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सर्गेई लावरोव्ह आणि पुतीन यांचे परराष्ट्र व्यवहार सल्लागार युरी उश्कोव्ह चर्चेत सहभागी होण्यासाठी उद्या सौदी अरेबियाच्या राजधानीत दाखल होतील, असं रशियन राष्ट्राध्यक्षाच्या कार्यालयाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी सांगितलं. अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो अमेरिकेच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील. रशिया-युक्रेन यांच्यातल्या संघर्षावर शांततापूर्ण मार्गानं तोडगा काढण्यासाठी तसंच रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या बैठकीची तयारी करण्यासाठी यावेळी चर्चा होईल, अशी माहिती रशियाच्या अध्यक्षांच्या कार्यालयानं दिली आहे.

**<><><><><>**

महिलांच्या प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यातला सामना वडोदरा इथल्या कोटाम्बी स्टेडियमवर सुरु आहे.

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ७ षटकात २ बाद ६१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज नागपुरात सुरु झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात विदर्भानं दिवसअखेर ५ बाद ३०८ धावा केल्या.

मुंबईविरुद्धच्या या सामन्यात विदर्भानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. दानीश मालेवारनं ७९, तर ध्रुव शोरीनं ७४ धावा केल्या. करुण नायरनं ४५ धावांचं योगदान दिलं. आजचा खेळ थांबला तेव्हा यश राठोड ४७, तर कर्णधार अक्षय वाडकर १३ धावांवर खेळत होता.

मुंबईतर्फे शिवम दुबे आणि शम्स मुलानी यांनी प्रत्येकी २, तर रॉयस्टन डायसनं १ गडी बाद केला.

अहमदाबाद इथं सुरु असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात, गुजरातविरुद्ध, प्रथम फलंदाजी करताना केरळनं पहिल्या दिवसअखेर चार बाद २०६ धावा केल्या.

//<><><><><>//